जनप्रवास 19 Dec. 2021

# विद्यार्थ्यांमध्ये क्रीडानैपुण्ये वाढविण्याचे आव्हान

राजगुरुनगर
जनप्रवास प्रतिनिधी



ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील

कोरोनाकाळात शाळा-महाविद्यालये बराच काळ बंद राहिल्याने विद्यार्थ्यांमध्ये क्रीडानैपुण्ये निर्माण करण्याचे मोठे आव्हान क्रीडाशिक्षकांसमोर उभे ठाकले असून त्यांनी अधिक परिश्रम घेऊन क्रीडासंस्कृती जोपासावी असे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले. ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समिती अंतर्गत आयोजित वेटलिफ्टिंग (मुले व मुली) व शरीर सौष्ठव (मुले) स्पर्धेच्या उदघाटन प्रसंगी बोलत होते.

या प्रसंगी पोलीस निरीक्षक सतीश गुरव, संस्था उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, संचालक बाळासाहेब सांडभोर, सतीश नाईकरे, बळवंत डांगले, प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ.एच.एम. जरे, उपप्राचार्य डॉ.संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे, पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीचे सहसचिव डॉ. सुनील पानसरे, डॉ. ज्ञानेश्वर चिमटे तसेच विविध महाविद्यालयातून आलेले शारीरिक शिक्षण संचालक, मार्गदर्शक, खेळाडू व पंच उपस्थित होते.

ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील पुढे म्हणाले की, ज्यांना खेळामध्ये गती आहे तसेच स्वत:मधल्या सृजनशीलतेला वाव देण्याची इच्छा आहे त्यांच्यासमोर क्रीडा आणि शारीरिक शिक्षणाचे आगळेवेगळे क्षेत्रही करियर म्हणून खुले आहे. जिद्द व चिकाटीच्या जोरावर क्रीडा स्पर्धांमध्ये भाग घेऊन यश संपादन करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

शरीरसौष्ठव स्पर्धेमध्ये निवड समिती सदस्य म्हणून प्रा. अनिल मरे, प्रा. उमेश जगताप, प्रा. रावसाहेब गरड तसेच वेटलिफ्टिंग मुले व मुली स्पर्धेकारिता डॉ. शितल शेंडकर डॉ. पांडुरंग लोहोटे यांनी काम पाहिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.मच्छिंद्र मुळूक, प्रास्ताविक प्रा. प्रतिमा लोणारी तर आभार प्रा. योगेश मोहिते यांनी मानले.